PUBLICATION - PRABHAT
DATE – OCTOBER 30, 2012
PAGE NO – 3 (GOOD MORNING PUNE)

## संक्षिप्त



झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत रामटेकडी परिसरातील लाभार्थींना सदनिकांच्या चाव्यांचे वितरण करण्यात आले.

# झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा पहिला टप्पा पूर्ण

**पुणे दि. २९ (प्रतिनिधी)** – झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत नाईकनवरे डेव्हलपर्स प्रा.लि. तर्फे हडपसरमधील रामटेकडी परिसरत पुण्यातील सर्वांत मोठा प्रकल्प आकाराला येत आहे. या प्रकल्पातील प्रथमा या पहिल्या इमारतीतील लाभार्थींना आज झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाठक यांच्या हस्ते सदनिकांचे वाटप करण्यात आले. माजी राज्यमंत्री बाळासाहेब शिवरकर हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संजय कोलते, नगरसेविका कविता शिवरकर, नगरसेवक सतिश लोंढे हे उपस्थित होते. महेश पाठक म्हणाले की, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातर्फे राबविण्यात येणाऱ्या योजनांतर्गत ३५०० घरे झालेली आहेत तर २५ योजनांमध्ये ५५०० घरे चालू आहेत. पुण्याला आता दोन लाख घरे लागणार आहेत. या प्रकल्पातील १७६ सदनिका असलेली पहिली इमारत बांधून पूर्ण झाली आहे. अशा प्रकारच्या आणखी दोन इमारतींचे बांधकाम सध्या सुरू असून त्या येत्या सहा महिन्यांत पूर्ण होतील, अशी माहिती हेमंत नाईकनवरे यांनी दिली.